# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक १४/०७/२०२२

**तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बँकेचे एटीएम मध्ये चोरी.**
**डिझेल / रॉकेल सदृष्य पेट्रोलीयम पदार्थ वापरुन एटीएम मशीन जाळुन टाकण्याचा प्रयत्न.**

आज दिनांक १४.०७.२०२२ रोजीचे रात्रौ ०१:३० ते ०७:०० च्या दरम्यान मराठा क्रांती चौक, तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बॅकेचे एटीएम मध्ये चोरी झाली असून तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ३३७/२०२२ भादवि कलम ४५७,३८०,४३६, ४२७,२०१ अन्वये अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधीक तपास तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे करित आहे. एकंदरीत घटनास्थळाची पाहणी केली असता एटीएम मशीन उघडण्यासाठी पासवर्ड/कोडवर्ड माहीत असलेल्या व्यक्तीने सदर चोरी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदर गोपनिय पासवर्ड/कोडवर्ड चा वापर करून सदरचे एटीएम मशीन खोलुन त्यामधून ५,८२,५०० रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले असून दिशाभूल करण्यासाठी चोरट्यांनी रॉकेल/डिझेल सारख्या ज्लालाग्रही पदार्थाचा वापर करून एटीएम मशीन पेटवून देण्याचा प्रयत्न कल्याचे दिसून येत आहे.

सदर घटनास्थळी मा. श्री. अंकुश शिंदे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचेसह श्री. आनंद भोईटे पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ , श्री. नंदकिशोर भोसले-पाटील सहायक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग, श्री. लांडगे पोलीस निरीक्षक तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, श्री. इंगवले पोलीस निरीक्षक दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा व गुन्हे शाखा ५ चे पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी भेट देवून घटनास्थळाची पाहणी केलेली आहे.

भारतीय रिझर्व बँकेचे परिपत्रक RBI/2018-19/214(P-19) No-2968/10.25.007/2018-2019 June 14, 2019 अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व बँक, पथसंस्थेचे संचालक यांना आपले एटीएम सार्वजनीक ठिकाणी कार्यान्वयीत करताना सुरक्षेची संपुर्ण खबरदारी घेवुन पुर्णवेळ सुरक्षारक्षकाची नेमणूक करणे तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविने बंधनकारक आहे. तरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व बँक, पथसंस्थेचे संचालक यांनी आपआपले एटीएम सार्वजनीक ठिकाणी कार्यान्वयीत करताना सुरक्षेची संपुर्ण खबरदारी घेवुन पुर्णवेळ सुरक्षारक्षकाची नेमणूक करून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे तसेच आपल्या बँक, पतसंस्था व्यवस्थापकाने एटीएम सेंटरमध्ये पैसे भरण्यासाठी ज्या एजेंन्सी नेमल्या आहेत त्या एजेंन्सीमधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची माहीती अद्ययावत ठेवावी तसेच त्यांची पोलीस चारीत्र्य पडताळणी करुन घ्यावी असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

**(रावसाहेब जाधव)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी, पिंपरी चिंचवड